# प्रारुप

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) च्या ऐरोळी, ठाणे येथील विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३

**विद्युत अधिनियम, २००३**

क्र.मविनिआ/तांत्रिक /परवाना अटी/एसपीपीएल / : विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६, ४२ आणि ४३ ने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालील विनियम करीत आहे :

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ**

या विनियमांना **"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) च्या ऐरोळी, ठाणे येथील विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३"** असे म्हणावे.

२) हे विनियम भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयातील वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली, यांनी दि. २ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या एसइझेड अधिसूचना क्र. एस.ओ. १८७६(इ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी लागू राहतील ;

३) हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अमलात राहतील.

**२ व्याख्या :** या विनियमात, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

ए. **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३;

बी. **“सह विकासक”** चा अर्थ, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (एफ) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याखेप्रमाणे राहील.

सी. **“विकासक” चा** अर्थ, वेळोवेळी अमलात असलेल्या, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (जी) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याखेप्रमाणे राहील.

ड. **“मानीव वितरण परवानाधारक”** म्हणजे-एसपीपीएल, ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. ३ मार्च, २०१० च्या अधिसूचनमुळे अधिनियमाच्या कलम १४ अंतर्गत, निर्देशित विशेष आर्थिक क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

इ. **“सर्वसाधारण अटी”** म्हणजे, वेळोवेळी अमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी;

एफ. **“एसपीपीएल”** म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत दि. २४ जुलै, २००६ रोजी नोंदणीकृत झालेली आणि विशेष आर्थिक क्षेत्र वाणिज्यिक विभाग, वाणिज्यिक मंत्रालय, यांनी दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेल्या पत्र क्र. एफ २/२८४/२००६-इपीझेड अन्वये विकासक म्हणून मान्यता दिलेली **‘**सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड**’**;

जी. **“एसइझेड अधिनियम”** म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ ( २००५ चा २८)

(एच) **“एसइझेड नियम”** म्हणजे वेळोवेळी अमलात असलेले विशेष आर्थिक क्षेत्र नियम २००६.

२.२ या विनियमांत वापरलेल्या आणि ज्याच्या व्याख्या करण्यात आलेली नाही अशा सर्व शब्द आणि उक्तींना विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार अर्थ राहील.

## ३ विनियमांची व्याप्ती

एसपीपीएलच्या संबंधातील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केलेल्या परवान्याच्या सर्वसाधारण अटी, या एसपीपीएलच्या परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि या अटी येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये त्यांच्या विजेचे वितरण आणि किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

## ४ वितरणाचे क्षेत्र किंवा पुरवठ्याचे क्षेत्र

मानीव वितरण परवानाधारकास विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत केलेले क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ३ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. २ नोव्हेबर, २००७ च्या एसइझेड अधिसूचना १८७६(इ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, सदर अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि अपवाद यांच्या अधीन राहून, आणि परिशिष्ट १ मध्ये जोडलेल्या नकाशात अधिक तपशिलासह दाखविलेले, प्लॉट क्र. ३, ऐरोळी, कळवा ट्रान्स ठाणे क्रीक इंडस्ट्रीयल एरिया येथील १९.३४ हेक्टर्सचे संपूर्ण क्षेत्र राहील.

## ५. परवान्याची मुदत

सदर परवाना, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, दि. २ नोव्हेंबर, २००७ (म्हणजेच एसइझेड अधिसूचनेचा दिनांका) पासून पंचवीस (२५) वर्षाच्या कालावधीकरिता अमलात राहील.

## ६. विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी

या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर लगेच वितरण परवानाधारक या विशिष्ट अटी व त्याचा परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहणीकरिता उपलब्ध करुन देईल.

## ७ अ-खंडित विजेचा पुरवठा

मानीव परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात चोवीस (२४) तास अ-खंडित विजेचा पुरवठा करण्याची व्यवस्था करील.

## ८ दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोगाला कोणत्याही वेळी, या विनियमातील कोणत्याही तरतुदीमध्ये दुरुस्ती करता येईल. या विनियमात केलेले कोणतेही बदल त्यासंबंधीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून अंमलात येतील आणि ते बदल त्यानंतर त्यांच्या बदल केलेल्या स्वरुपातच अंमलात राहतील किंवा राहणार नाहीत, जसे असेल तसे, तथापि, हे बदल अंमलात आणत असताना, यापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेला, अशा बदलामुळे किंवा रद्द करण्यामुळे, बाधा येणार नाही.

## ९ अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम आणि विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांक : -------------, २०१३.